# प्रकरण चौथे

## टीकात्मक अभ्यास

# प्रकरण चौथे

## टीकात्मक अभ्यास

### १) प्रस्तावना :

विनोबा भावे यांच्या मते राज्य निराळे, स्वराज्य निराळे, राज्य हिंसेने मिळवता येते. स्वराज्य अहिंसेशिवाय अशक्य म्हणून विचारवंत राज्य इच्छीत नाहीत. पण सारे स्वराज्यासाठी झटू या, म्हणून तळमळत असतात. "न त्वहं कामये राज्यम्" आणि "यतेमहि स्वराज्ये" हे त्यांचे निषेधक आणि विधायक राजकीय उध्दोष असतात.

"स्वराज्य" हा एक वैदिक परिभाषेतला शब्द आहे. त्यांची व्याख्या अशी केली जाते. स्वराज्य म्हणजे प्रत्येकाचे राज्य, म्हणजे प्रत्येकाला 'माझें' वाटेल असे राज्य म्हणजे सर्वांचे राज्य, म्हणजेच रामराज्य.

'स्वराज्यशास्त्र' हे अहिंसक समाज निर्मितीचे शास्त्र आहे. यालाच विनोबांनी "लोकनीती" असे ही म्हटले आहे. स्वराज्याचे शास्त्र नित्य वाढते आहे. त्याची पध्दती देश कालानुसार बदलणारी आहे. पण त्याची मूलतत्वें शाश्वत आहेत. त्या शाश्वतांच्या आधारावर ह्यातला आराखडा आखला आहे, असे विनोबांचे मत आहे. त्यामुळे त्याचे 'स्वराज्यशास्त्र' एकाच वेळी जसे स्थलकालसापेक्ष आहे, तसेच ते सार्वकालिक आणि सार्वभौमही आहे. असे विचार विनोबा आपल्या मौलिक अशा ग्रंथाबद्दल मांडतात. प्रस्तुत प्रकरणामध्ये 'हिंदस्वराज्य' मध्ये महात्मा गांधी यांनी मांडलेली भूमिका तसेच 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' या लिखानाच्या दरम्यानच्या काळातील जे राजकीय

बदल झाले त्याचे विवेचन करणार आहे . तसेच 'हिंदस्वराज्य'मधील 'स्वराज्यशास्त्रात' काही मुद्दयाची केलेली वाढ याचे विवेचन केले आहे. 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथाचा तुलनात्मक आणि टीकात्मक अभ्यास केला आहे.

## २) 'हिंदस्वराज्य'मध्ये महात्मा गांधीनी मांडलेली भूमिका :

संसदीय लोकशाहीवर गांधीनी त्यांच्या 'हिंदस्वराज्यात' अत्यंत जहाल अशी टीका केली आहे. सत्ताधाऱ्यांची बटीक किंवा वेश्या, एक वांझोटी व्यवस्था अशा जळजळीत शब्दांत गांधीनी या व्यवस्थेचा धिक्कार आणि निषेध केल्याचे दिसून येते . याची कारणमीमांसासुध्दा त्यांनी हिंदस्वराज्याच्या पाचव्या प्रकरणात अतिशय निःसंदिग्ध शब्दात स्पष्ट केली आहे. मात्र गांधीच्या मते या व्यवस्थेचा मुख्य दोष म्हणजे तिच्या बुडाशी असलेली आधुनिक पाश्चात्य सभ्यता अथवा संस्कृती, गांधीच्या मते ही सभ्यता अथवा संस्कृती मुळातच हिंसेवर उभी आहे. हिंसा म्हणजे दुजाभाव, परात्मता, विविक्ती किंवा अलगाव ही या सभ्यतेच्या हदयस्थानी आहे. अशा हिंसाधिष्ठित सभ्यतेचे कुठलेच अपत्य निर्दोष आणि निरामय राहू शकणार नाही . महात्मा गांधीजींच्या मते "हे पुस्तक व्देषाऐवजी प्रेम–धर्माची शिकवण देते. हिंसेच्या ऐवजी आत्मबलिदानाची प्रेरणा देते. पाशवी बलाचा सामना करण्यासाठी आत्मबलाला उभे करते." जीवनाकडे पहाण्याची एक सर्वस्वी वेगळी दृष्टी गांधींना या ठिकाणी अभिप्रेत आहे. त्यांच्या दृष्टीने भारतीय स्वातंत्र्याचा लढासुध्दा या वेगळया जीवनदृष्टीचा, म्हणजेच एक सांस्कृतिक संघर्ष होता. तो लढा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नव्हता. त्यामुळे इंग्रज राज्यकर्ते भारतातून निघून जाणे या गोष्टीला त्यांच्या

मते फारसे महत्व नव्हते. इंग्रज भारतातूल निघून गेले आणि आम्ही त्यानंतरही त्यांची सभ्यता अथवा संस्कृती कवटाळून बसलो तर त्या अवस्थेला 'स्वातंत्र्य' मानण्यास गांधी कधीच तयार नव्हते. त्यांच्या मते ही गुलामगिरीच होती . तेव्हा स्वातंत्र्याचा लढा हा एका नव्या प्रेममय, अहिंसाधिष्ठित समाजनिर्मितीचा लढा आहे ही त्यांची भूमिका होती . म्हणून 'स्वातंत्र्य' या शब्दाऐवजी ते 'स्वराज्य' हा शब्द अधिक पसंत करीत . हे 'हिंदस्वराज्य' या नावावरुन ही हे लक्षात येते. तेव्हा स्वातंत्र्य वेगळे आणि 'स्वराज्य' वेगळे. स्वातंत्र्याचा संबंध राज्यव्यवस्थेशी आहे आणि 'राज्य'म्हटले की हिंसा आलीच . मग ते 'राज्य' जनतेने आपल्या स्वच्छेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीचे का असेना, खरे समतायुक्त, मैत्रिपूर्ण आणि सौंदर्यमय असे लोकजीवन हिंसेवर आधारलेले असूच शकत नाही . म्हणून गांधीनी 'हिंदस्वराज्या'ची मुख्य भूमिका, स्वराज्यासंबंधी अखेरच्या परिच्छेदात फार स्पष्टपणे व्यक्त केले आहे. गांधीजी म्हणतात,

१ . स्वराज्य म्हणजे स्वतःवरचे राज्य

२ . त्याची किल्ली सत्याग्रह आत्मबल किंवा दयाबळ ही आहे.

३ . ते बल वापरण्याकरिता समग्र अर्थाने स्वदेशी व्रताचे पालन करण्याची जरुर आहे.

४ . जे आपण करु इच्छितो ते इंग्रजांच्या व्देषाने नव्हे तर ते करणे आपले कर्तव्य आहे. म्हणून केले पाहिजे. गांधीजींच्या मते इंग्रजांशी माझे वैर नाही तर त्यांच्या सभ्यतेशी आहे. ही 'हिंदस्वराज्या'ची मुख्य भूमिका आहे.

३) **१९०९ ते १९४० या काळात झालेले राजकीय बदल** :

महात्मा गांधींनी १९०९ साली 'हिंदस्वराज्य' हे पुस्तक लिहिले आणि आचार्य विनोबा भावे यांनी १९४० साली 'स्वराज्यशास्त्र' हे पुस्तक लिहिले या दरम्यानच्या कालखंडात राजकीय बदलाचा थोडक्यात आपण इथे आढावा घेणार आहोत. सन १९०९ साली 'मोर्लेमिटो' सुधारणा कायदा करण्यात आला. त्यात मुसलमानांसाठी विभक्त मतदार संघ देण्यात आले. सन १९१५ साली गांधींजी दक्षिण अफ्रिकेहून मायदेशी परतले. दक्षिण अफ्रिकेतील भारतीयांनी तेथील गोऱ्यांच्या वर्णवर्चस्वाविरुध्द गांधींच्या नेतृत्वाखाली जो सत्याग्रह संग्राम केला होता. त्याचे वृत्त गांधींच्या आगमनापूर्वीच भारतात येऊन पोहोचले होते. त्यामुळे भारतातील लोकांच्या मनात गांधींची भूमिका आणि नेतृत्व याबद्दल उत्सुकता व आदर निर्माण झाला होता. या काळा दरम्यान जगात पहिल्या महायुध्दास सुरु झाली होती. पुढे १९१६ साली मुस्लीम लीग आणि कॉंग्रेस दरम्यान लखनौ करार झाला. यातून हिंदू–मुसलमान ऐक्य झाले. १९१९ साली रौलट कायदा झाला आणि त्याच्या शिफारशीनुसार शासनाने जे कायदे मंजूर केले त्यांमध्ये राजद्रोही लिखाण जवळ बाळगणे हा गुन्हा मानण्यात आला होता. या कायद्याने लोकांच्या मुलभूत हक्कांवर गदा येत असल्याने त्याला विरोध करणे आवश्यक आहे, असे गांधींचे मत होते. म्हणून १९१९ साली त्यांनी सत्याग्रह सभेची स्थापना केली आणि बंदी घातल्या गेलेल्या लिखाणाची विक्री करुन हा कायदा मोडण्यास लोकांना प्रवृत्त केले. या रौलट कायदयाविरुध्द पंजाबमध्ये उग्र अशी निदर्शने झाली. जगातील रातकारणात रशियात 1917 साली क्रांती झाली.

रशियातील क्रांतीनंतर साम्यवादाबद्दल फार मोठया अशा अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. गरिबांचा, कष्टकऱ्यांचा तारणहार म्हणून त्याचेकडे पाहिले जात होते. परंतु त्याला लवकरच छेद जाऊ लागला याचा अभ्यास विनोबांनी जवळून केला.

गांधी प्रणीत अहिंसात्मक असहकाराच्या कार्यक्रमाने १९२० साली भारतातील राजकीय अन्यायाविरुध्द सामुदायिक प्रतिकाराच्या चळवळीला प्रारंभ झाला. पंजाबमधील हत्याकांडाला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा करणे आणि खिलाफतीच्या बाबतीत मुसलमानांना मान्य होईल असा तोडगा काढणे, अशा मागण्या गांधींनी लोकांच्या वतीने सरकारकडे केल्या होत्या. राष्ट्र सभेच्या पुढाऱ्यांच्या मताला मान देऊन स्वराज्याचाही या मागण्यामध्ये समावेश करण्यात आला. त्यादृष्टीने सरकारकडून या मागण्या मान्य करुन घ्यावयाच्या तर त्यांच्या मागे लोकांची शक्ती उभी करणे आवश्यक होते. त्यामुळे गांधींनी अहिंसात्मक असहकाराचा कार्यक्रम लोकांपुढे मांडून सत्याग्रहाच्या मार्फत असहकार चळवळ अंमलात आणली. गांधींनी केलेल्या सामुदायिक कृतीच्या आव्हानाला समाजाच्या निरनिराळया थरांतून उत्सफूर्त प्रतिसाद मिळाला. त्यामुळे परकीय शासनाचे नैतिक अधिष्ठान धुळीस मिळाले. एवढा परिणाम या असहकार चळवळीने झाला. १९२२ साली कॉंग्रेसतर्फे वल्लभभाईच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे एक झेंडा सत्याग्रह आयोजित करण्यात आला. भारताच्या निरनिराळया प्रांतातून जवळजवळ दोन हजार सत्याग्रहींनी या सत्याग्रहात भाग घेतला व या प्रश्नावरील आपल्या भावनांची तीव्रता शासनाच्या निर्दशनास आणून दिली. मात्र पुढे चौरीचुरा येथे लोकांनी पोलिसांना जिवंत

जाळल्याची बातमी गांधींजीच्या कानावर आली. तेव्हा कायदेभंगाचा कार्यक्रम गांधींनी ताबडतोब रद्द केला आणि हिंसेला आळा घालण्यासाठी स्वतः उपवास आरंभिला.

नंतरच्या काळात दास आणि मोतीलाल नेहरु यांनी पुढाकार घेऊन स्वराज्य पक्षाची स्थापना केली आणि त्यांच्या मार्फत १९२३ सालच्या कायदेमंडळाच्या निवडणुका लढविल्या. या पक्षाने अनेक लोक कायदे मंडळावर निवडूनही आले. स्वराज्य पक्षाचे १९२६ साली काँग्रेच्या झेंडयाखाली निवडणुका लढविल्या. गांधींनी मात्र या काळात दौरे काढून विधायक कार्यक्रमाचाच प्रचार केला व आपल्या अनुयायांनाही निवडणुकीच्या राजकारणापासून दूर राहून सर्वस्वी विधायक कार्यालाच वाहून घेण्याचा सल्ला दिला. गांधींच्या नेतृत्वाखाली झालेली सामुदायिक प्रतिकाराची खरी देशव्यापी चळवळ म्हणजे १९३० साली झालेली सविनय कायदेभंगाची चळवळ होय. गांधींच्या सत्याग्रही तंत्राचा पुर्णपणे विकसित असा अविष्कार आपल्याला तिच्यामध्ये पाहावयास सापडतो. भारतातील राजकीय परिस्थिती केवळ युक्तिवादाने राज्यकर्त्यांचे मतपरिवर्तन करता येणार नाही. इंग्रज सत्ताधाऱ्यांना केवळ बळाचीच भाषा कळते म्हणून बळाचा प्रतिकार बळानेच केला पाहिजे अशी गांधींची धारणा मात्र पाशवी शस्त्रबळाऐवजी त्यांचा भर नैतिक अंतः सामर्थ्यावर होता. शेवटी गांधी आयर्विन करार होऊन ही चळवळ स्थगित करण्यात आली. गोलमेज परिषदेला आपले प्रतिनिधी पाठविण्याचे राष्ट्रसभेने मान्य केले. गांधी–आयर्विन कराराने देशातील राष्ट्रसभेच्या प्रतिष्ठेत बरीच भर पडली. गांधी–आयर्विन समेटानंतर राष्ट्रसभेचे एकमेव प्रतिनिधी म्हणून गांधी गोलमेज परिषदेला हजर राहिले. गांधी तुरुंगात असताना इंग्रज सरकारने जो जातीय निवाडा जाहीर केला. त्यामध्ये दलितांसाठी विभक्त

मतदारसंघाची तरतूद करण्यात आली होती. हा निवाडा जाहीर होताच गोलमेज परिषदेतील आपल्या प्रतिज्ञेला स्मरुन गांधींनी प्राणांतिक उपोषण सुरु केले. लोकमताच्या दडपणाखाली गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी विभक्त मतदारसंघाचा आग्रह सोडून देणे दलित पुढाऱ्यांसाठी भाग पडले आणि दलित पुढारी आणि महात्मा गांधी यांच्यात पुणे करार होऊन संयुक्त मतदारसंघ व दलितांसाठी जातीय निवाडयाने मिळालेल्या जागांहून अधिक राखीव जागा अशी तडजोड घडून आली. त्यानंतर गांधीजींनी उपोषण समाप्त करुन काही काळ हरिजन कार्याला सर्वस्वी वाहून घेतले.

नवा घटना कायदा १९३५ साली मंजूर झाला. परंतु केंद्रीय पातळीवर लोकप्रतिनिधींच्या हाती सत्ता देण्याची त्यात पुरेशी तरतूद केलेली नसल्याने भारतातील बहुतेक पक्षांनी त्यातील संघाराज्याच्या कल्पनेला कसून विरोध केला. प्रांतिक कायदेमंडळात मात्र लोक नियुक्त सभासदांची संख्या बरीच वाढविण्यात आली होती. प्रांतिक विषयात मंत्रिमंडळांना स्वायत्तताही देण्यात आली होती. या कायदयानुसार १९३७ साली झालेल्या निवडणुकांत कॉंग्रेस पक्षाने अधिकृत रीत्या भाग घेतला. ११ पैकी ८ प्रांतात १९३७ च्या निवडणुकीनंतर कॉंग्रेस पक्षाची मंत्रिमंडळे अधिकार पदावर आली होती. सत्तारुढ कॉंग्रेस पक्षाने सामान्य लोकांच्या गाऱ्हाण्यांची तत्परतेने दखल घ्यावी आणि चरखा, दारुबंदी व दलितोध्दार या विधायक कार्यक्रमाचा शासनाच्या मार्फत पाठपुरावा करावा अशी गांधींची अपेक्षा होती. युरोपात १९३९ सालच्या सप्टेंबर महिन्यात दुसऱ्या महायुध्दाला प्रारंभ झाला. जर्मनी विरुध्द इंग्लंडने युध्द पुकारताच भारतातील विधिमंडळे आणि राजकीय पुढारी यांच्याशी कोणत्याही प्रकारे सल्लामसलत न करता भारतही

इंग्लंडच्या बाजूने युध्दात उतरत असल्याचे इंग्लंडने जाहीर केले आणि युध्दामुळे झालेल्या आणीबाणीच्या परिस्थितीत भारताच्या संरक्षणाची तजवीज करण्याच्या दृष्टीने अनेक वटहुकुम जारी केले. याच दरम्यान सविनय कायदेभंगाची चळवळ वैयक्तिक पातळीपुरती मर्यादीत ठेवण्याचा गांधीजींनी निर्णय घेतला. गाधींनी १७ आक्टोंबर १९४० साली पहिला सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड केली. विनोबांनी तीनवेळा सत्याग्रह केला आणि तीनवेळा अटक झाली. या शिक्षेच्या कारावासात असतानाच 'स्वराज्यशास्त्र' हा मौलिक ग्रंथ विनोबांनी रचला.

अशाप्रकारे महात्मा गांधींनी १९०९ साली लिहिलेले 'हिंदस्वराज्य' आणि १९४० साली आचार्य विनोबा भावे यांनी लिहिलेले 'स्वराज्यशास्त्र' या दोन्ही ग्रंथांच्या लिखाणामधल्या कालखंडातील जे राजकीय बदल झाले त्याचे थोडक्यात विवेचन केले आहे. या सर्व बदलांचा विचार विनोबांनी 'स्वराज्यशास्त्र' हे पुस्तक लिहिताना केला होता.

## ४) 'हिंदस्वराज्य'मधील 'स्वराज्यशास्त्रात' काही मुद्दयाची केलेली वाढ :

महात्मा गांधीजींनी 'हिंदस्वराज्य'मध्ये संसदीय लोकशाहीवर जहाल अशी टीका केली परंतु आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्रात' जगातील राजकीय व्यवस्थेवर टीका केली. यात त्यांनी तीन विभागात विभागणी केली. एकायतन,अनेकायतन, सर्वायतन, यात त्यांना सर्वायतन व्यवस्था अपेक्षीत होती. ही सर्वांचे राज्य असणारी व्यवस्था होती. यात त्यांनी साम्यवादावर टीका करुन साम्ययोगाची कल्पना मांडली. इथे ते महात्मा गांधी विचारास पुढे नेताना दिसतात. विनोबांच्या मते, साम्यवादाला आत्म्याची एकता मान्य नाही

आणि साम्ययोगाला ती मान्य आहे. एवढेच नव्हे तर या आधाराने साम्ययोग अधिक खोलवर जाऊ इच्छितो म्हणून नैतिक, अर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात या विचारांचे क्रांतिकारक परिणाम होतात. साम्ययोगाचे म्हणणे हे आहे की, कोणत्याही रुपातील संपत्तीचे मालक आपण नाही. साम्यवाद व साम्ययोग यांच्यामध्ये हाच मोठा भेद आहे.

महात्मा गांधीजींनी 'हिंदस्वराज्य' या पुस्तकात लोकनीतीची कल्पना पुसट अशी मांडली होती परंतु विनोबा भावे यांनी लोकनीतीची कल्पना स्पष्ट स्वरुपात मांडली. आचार्यांनी राजनीतीला लोकनीती हा पर्याय दिला. विनोबांच्या मते नागरिकांत परस्परांविषयी ज्यावेळी प्रतिष्ठेची भावना असते व आपल्या सुखसोयींच्या आधी जेव्हा ते दुसऱ्यांच्या सुखसोयींचा विचार करतात तेव्हा त्याला 'लोकनीती' म्हणतात. अशी विनोबांनी लोकनीती कल्पना व्यापक दृष्टीकोनातून मांडली आहे. यामध्ये विनोबांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करुन ग्रामस्वराज्य हा पर्यायी विचार मांडला. त्यांच्या मते स्वराज्य म्हणजे सगळया देशाचे राज्य जेव्हा दुसऱ्या देशाची सत्ता आपल्या देशावर नसते तेव्हा त्याला 'स्वराज्य' म्हणतात. जेव्हा ती प्रत्येक गावात येते तेव्हा त्याला 'ग्रामराज्य' म्हणतात. गावात सर्व लोक सुज्ञ झाले, कोणावर सत्ता चालवण्याची आवश्यकता उरली नाही, तर त्याला 'रामराज्य' म्हणतात असे विचार विनोबा मांडतात आणि ग्रामस्वराज्य हे स्वावलंबी आणि स्वायत्त असावे असे त्यांचे मत आहे. स्वराज्याचा आधार हा अहिंसाधिष्ठित असला पाहिजे असे विनोबांचे मत होते यासाठी विनोबांनी सत्याग्रहाची कल्पना विस्तृतपणे मांडली आहे. त्यांच्यामते सत्याग्रही म्हणजे सत्याचे ग्रहण करणारा, सत्याला चिकटून राहणारा,

प्रतिपक्षाचे सत्यग्रहण करण्याची ज्याची तयारी असेल तो सत्याग्रही होय आणि या सत्याग्रहाच्या माध्यमातून अहिंसाधिष्ठित समाज निर्माण करुन स्वराज्य स्थापनेचा त्यांनी विचार मांडला आहे.

## ५) 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथाचा तुलनात्मक आणि टीकात्मक अभ्यास :

'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यामध्ये स्वातंत्र्य म्हणजे स्वराज्य नव्हे. भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही स्वराज्याच्या निर्मितीसाठी वेगळया प्रयत्नांची गरज राहील हे गांधी विचाराचे सुत्र अगदी अखेरपर्यंत कायम होते. भारताच्या खऱ्याखुऱ्या स्वराज्याची दिशा कोणती असेल याचे संकेत येथे आपल्याला मिळतात. तसेच स्वराज्य आणि स्वदेशी यातील अभिन्नत्वातदेखील तेच संकेत प्राप्त होतात. गांधीच्या दृष्टीने स्वराज्य आणि स्वदेशी या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू होत्या. आपुलकी, ममत्व किंवा बंधुभाव हा स्वराज्याचा आत्मा आहे. ही ममता निर्माण करण्याचे मुख्य साधन स्वदेशी हेच असू शकते. अन्यथा स्वराज्य प्राप्तीनंतरही नागरिकांच्या जीवनात परात्मता निर्माण होऊ शकते ते टाळणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यासोबत आत्मीयता कशी निर्माण होईल हे आधुनिक राजकीय विचारापुढचे एक मोठेच आव्हान आहे. "स्वराज्य" आणि "स्वदेशी"हे या आव्हानाला गांधीनी उत्तर दिले आहे. विनोबांच्या स्वराज्यशास्त्राच्या केंद्रस्थानीदेखील हेच आव्हान आहे. विनोबांनी हा विचार खालील शब्दात व्यक्त केला आहे. "स्वराज्य हा एक वैदिक परिभाषेतला शब्द आहे. त्याची व्याख्या अशी केली जाते. स्वराज्य म्हणजे

प्रत्येकाचे राज्य, म्हणजे प्रत्येकाला 'माझे' वाटेल असे राज्य, म्हणजे सर्वांचे राज्य, म्हणजेच रामराज्य". विनोबांची ही भूमिका नीट लक्षात घेतली तर 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' या दोन स्वल्पाक्षरी परंतु बृहदाशयी ग्रंथांच्या जैविक परस्परसंबंधाची आपल्याला कल्पना येईल. 'हिंदस्वराज्या'पासून सुरु झालेली एक विचारधारा विनोबांच्या 'स्वराज्यशास्त्रा'पर्यंत पोचलेली आपण बघू शकतो. या दृष्टीने विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' म्हणजे गांधींच्या 'हिंदस्वराज्य' चेच पुढले पाऊल आहे असेच म्हणावे लागेल. वेगळया शब्दांत सांगावयाचे झाल्यास असेही म्हणता येईल की, 'हिंदस्वराज्या'पासून आरंभ झालेल्या अहिंसक समाज निर्मितीच्या शोधाचा आणि प्रकल्पाचा विस्तार आणि विकास आपल्याला 'स्वराज्यशास्त्र' मध्ये पहावयास मिळतो.[१]

'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यांच्या शैलीत आणि मांडणीतही फार मोठा फरक आहे. तसे पाहिले तर दोन्ही पुस्तकांची मांडणी प्रश्नोत्तरांच्या स्वरुपातच आहे. पण हे साम्य काहीसे वरवरचे आहे. गांधींनी 'हिंदस्वराज्या'मध्ये आधुनिक पाश्चात्य सभ्यतेचे अथवा संस्कृतीचे अत्यंत कठोर अशी चिकित्सा केली आहे. हे करीत असतानाच त्यांची अभिजात भारतीय संस्कृतीची थोरवी ही स्पष्ट केली आहे. त्यामुळे हे सर्व लेखन सांस्कृतिक संकेतांनी उघडपणे बहरलेले असे लेखन आहे. 'स्वराज्यशास्त्रा'ची शैली एखादे गणिताचे पुस्तक असावे तशी वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय आहे. त्या पुस्तकाच्या नावावरुनच त्याच्या शैलीची आपण कल्पना करु शकतो. ते 'शास्त्र ' असल्यामुळे ते स्वाभाविकपणे सार्वत्रिक आणि शाश्वत आहे. कुठल्याही सामाजिक शास्त्राला लागू पडतात

त्या मर्यादा येथेही लागू पडतीलच. पण कुठलेही सामाजिक शास्त्र ज्या अर्थाने आणि ज्या मर्यादेत सार्वत्रिक असते त्याच अर्थाने आणि त्या मर्यादेत विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' हे लोकनीतीचे विज्ञान आहे, असे आपण म्हणू शकतो. त्यामुळे हे लेखन एकदोन संकल्पनांचा अथवा संज्ञांचा अपवाद वगळता सांस्कृतिक अथवा देशी सांकंतिकतेपासून पुर्णपणे मुक्त आहे असे म्हणता येईल; असे असले तरी विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' भारतीय आध्यात्मिक दर्शनाच्या विशेषतः त्यातील अव्दैती विचारांच्या अधिष्ठानावर उभे आहे . अशा रितीने या विचारांची सार्वत्रिकता आणि सार्वकालिकता यांच्यासमोर एक प्रकारचे प्रश्नचिन्ह उभे करण्यात आले आहे. 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यांतील विचारसरणीवर भारतीय आध्यात्मिक परंपरेचे ठसे आहेत. या काहीशा 'देशी' प्रभावामुळे ही विचारसरणी एका अर्थाने संस्कृतीसापेक्ष अथवा प्रादेशिक होते. अथवा तिच्या सार्वत्रिक व शाश्वत मौलिकतेला काही मर्यादा पडतात अशी टीका आपणास या दोन्ही ग्रंथांबाबत करता येईल .[२]

महात्मा गांधी १९०९ साली 'हिंदस्वराज्य' पुस्तक लिहित असताना भारतात स्वातंत्र्य चळवळी सुरु होत्या. म्हणून 'हिंदस्वराज्य'ला भारतीय स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी आहे . मवाळ राजकारण्यांच्या राजकारणाबद्दल त्यांच्या मनामध्ये काही संदेह होते. काही शंका होत्या गांधींनी त्यांना पूर्ण पाठिंबा दिला असे नव्हते आणि जहाल राजकारणी होते त्यांच्या वर तर गांधी टीका करताना दिसतात. महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्या'त बंगालच्या फाळणीचाही उल्लेख केला आहे. गांधींच्या मते भारतीय स्वातंत्र्य लढयास खरी जागृती बंगालच्या फाळणीनंतर आली. त्यामुळे इंग्रज सत्तेला बंगालच्या फाळणीनंतर तडा गेला आहे. महात्मा गांधी हिंदु–मुसलमान ऐक्याच्या प्रश्नांचा

उल्लेख करीत इंग्रजांचे राज्य आल्यामुळे काही प्रश्न या दोन समुदायामध्ये निर्माण झाले आहेत असे सांगून महात्मा गांधी आधुनिक ब्रिटीश सरकारवर टीका करताना दिसतात. या सर्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीची 'पार्श्वभूमी' 'हिंदस्वराज्य' या ग्रंथातात आली आहे. तसेच आचार्य विनोबा भावे व यांनी 'स्वराज्यशास्त्रा'त जगातील सर्व राजकीय व्यवस्थांचा विचार केला आहे. त्यांनी नाशीवक, फाशीवाद, साम्यवाद या आणि इतर व्यवस्थांचा उल्लेख करुन. त्यांनी त्यांची विभागणी एकायतन, अल्पसंख्यासतन, बहुसंख्यायतन आणि सर्वायतन असे विभाग पाडले आणि सर्व राजकीय व्यवस्थेवर टीका करण्याचे सर्वायतन व्यवस्था स्थापन करण्याचे विचार 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात मांडले. त्यामुळे 'स्वराज्यशास्त्रा'चा वैश्विक पाया आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या स्वायत्तेवर, स्वराज्यावर, लोकशाहीवर आधारलेला 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात महात्मा गांधींनी आधुनिक संस्कृतीला व संसदीय शासन व्यवस्थेला पर्यायी व्यवस्था किंवा पर्यायी राजकारणाबाबतीचा विचार मांडला आहे. परंतु सामाजिक, आर्थिक, राजकीय तत्वाचा त्यांनी 'हिंदस्वराज्या'त उहापोह केला नाही. पण आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात स्वायत्त, स्वावलंबी, शासन निरपेक्ष, शासनयुक्त समाज स्थापून त्यांनी सर्वायतन ही व्यवस्था पर्यायी व्यवस्था म्हणून दिली. अशाप्रकारे विनोबांनी 'स्वराज्यशास्त्रा'त सामाजिक, आर्थिक, राजकीय विचारांची मांडणी केली आहे. तसेच विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात राज्यघटनेचा उल्लेख आढळतो. तसा उल्लेख 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात आढळत नाही.

आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात अंतरराष्ट्रीय राजकारणातील फॉशीझम, नाझीझम, साम्यवादी समज याचा उल्लेख केला आहे आणि या सर्व राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करुन त्यावर टीका करताना विनोबा दिसतात. अंतरराष्ट्रीय राजकारणातील सर्व राजकीय व्यवस्थांचा त्यांनी उल्लेख 'स्वराज्यशास्त्रा'त केला आहे. तसा महात्मा गांधीजींच्या 'हिंदस्वराज्यात' आपणास दिसत नाही.

अहिंसक मार्गाने राज्य कसे चालवावे याचे विवेचन आचार्य विनोबा भावेंनी केले. अहिंसा हेच स्वराज्याचे एकमेव अधिष्ठान आणि प्राणतत्व आहे. हाच 'स्वराज्यशास्त्रा'चा मुख्य संदेश आणि आशय आहे. विनोबांच्या मते अहिंसाधिष्ठित स्वराज्य ही एक आदर्श व्यवस्था आहे. परंतु 'हिंदस्वराज्या'त महात्मा गांधी पर्यायी व्यवस्था सांगितली पण या सर्व बाबीचा उल्लेख केला नाही.

## समारोप :

'हिंदस्वराज्य' ही छोटीशी पुस्तिका गांधीजींनी १९०९ साली इंग्लंडहून दक्षिण अफ्रिकेला जात असताना जहाजावर लिहिली. इंग्लंडमध्ये भारताच्या स्वातंत्र्याबद्दल त्यांची अनेक भारतीयांशी चर्चा झाली. हया पार्श्वभूमीवर आम जनतेचे खरे स्वराज्य कशात आहे. याबाबत आपली मते या पुस्तिकेत गांधीजींनी मांडली आहेत. महात्मा गांधींना हिंदुस्थानाचे रुपांतर इग्लिस्तानमध्ये करायचे नव्हते तर भारतात एक पर्यायी व्यवस्था स्थापन करायची होती.

'हिंदस्वराज्य' गांधीजींच्या या छोटयाशा पुस्तिकेला गांधीवादी क्रांतीचा जाहीरनामा म्हणण्यात आले आहे. या पुस्तिकेत आधुनिक पाश्चात्य सभ्यतेचे कठोरपणे

खंडन करण्यात आले आहे आणि पर्यायी जीवन दर्शनाची स्वराज्य, सत्याग्रह आणि स्वदेशी ही त्रीसुत्री मांडण्यात आली आहे. भारताने आणि साऱ्या जगानेच भविष्यात कोणती वाट धरावी, कोणती सभ्यता आदर्श मानावी, संस्कृती कशाला म्हणावे या मुद्दयांच्या बाबतीत मुळातून विचार करण्याला प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य या पुस्तिकेत आहे म्हणून ही पुस्तिकेत आहे म्हणून ही पुस्तिका आजही मौलिक आहे.

जगात शांति खऱ्या अर्थाने नांदायची असेल तर हिंसेचा गुणाकार कसा थांबेल याची चिंता करण्याची निकट बडया राष्ट्रांसाठी जाणवत आहे. त्याच वेळेपर्यंत मतभेदाचे व कलहाचे मुद्देही राहणार तोवर संघर्ष अटळ आहे. तो टाळून शांतता प्रस्थापित करावी असेही म्हणणे योग्य नाही. ती भयग्रस्त लाचार शांतता असेल ती टिकणार नाही, हिंसेचा नव्हे तर मैत्रभावाचा गुणाकार करणाऱ्या संघर्षाच्या रीतीच्या शोधात जग आहे. समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी अटळ असलेल्या संघर्षातून फुटीरपणा न वाढता व हिंसेचा गुणाकार न होता परस्पर संकल्पना व मैत्री कशी वाढेल यासाठी 'हिंदस्वराज्यां'मध्ये गांधी विचारांच्या आकलनाला, अन्वयनाला, चिकित्सेला आणि मांडणीला आज एक नवी प्रासंगिकता, औचित्य आणि धार प्राप्त झाल्याचे आपण बघू शकतो. एका नव्या सभ्यतेचा अथवा संस्कृतीचा जाहीरनामा या दृष्टीने आज गांधींच्या 'हिंदस्वराज्या'चा अभ्यास केला जात आहे. गांधींचे 'हिंदस्वराज्या'चे लेखन अत्यंत मौलिक आहे. या विषयी शंका असण्याचे काहीच कारण नाही.

'स्वराज्यशास्त्र' हे आचार्य विनोबा भावे यांचे पुस्तक अल्पाक्षरी परंतु बृहदाशयी ग्रंथ आहे. अवघ्या सत्तावन्न पानांचे हे पुस्तक आहे. विनोबांनी १९४० च्या कारावासात ते रचले. 'स्वराज्यशास्त्र' हे अहिंसक समाज निर्मितीचे शास्त्र आहे. हयातील चित्र हे एका आदर्श समाज रचनेचे आहे परंतु हा आदर्श मानवाच्या आवाकाच्या पलीकडचा आहे असे समजण्याचे कारण नाही. खरे म्हणजे सर्वसामान्य मानवांचे दैनंदिन, कौटुंबिक जीवन ज्या मूल्यांच्या आधारावर उभे असते त्याच मुल्यांचे काहीसे व्यापक आणि परिष्कृत असे रुप माणसामाणसांच्या सामाजिक आर्थिक संबंधातूनही प्रतिबिंबित व्हावे एवढीच काय आकांक्षा विनोबांची 'स्वराज्यशास्त्रा'त आहे. अर्थात हे बोलणे सोपे असले तरी करणे अवघड आहे यात शंका नाही. तथापि अवघड म्हणजे अशक्य नव्हे. हे परिवर्तन घडून येण्यासाठी माणसाच्या मनोवृत्तीत बदल घडून यावा लागेल. त्यातूनच सामाजिक आर्थिक घडीही आपोआप बदलेल. अहिंसक सामाजिक परिवर्तनाचा एकमेव मार्ग 'हृदय परिवर्तन' हाच आहे. या हृदय परिवर्तनासाठी कुणी कुणाची वाट बघण्याची जरुर नाही. ज्या क्षणी आणि ज्या व्यक्तिच्या बाबतीत हे हृदय परिवर्तन घडून येईल, त्या क्षणी त्या व्यक्तिच्या जीवनात क्रांतीचे बीजारोपण होईल. हे स्वराज्यशास्त्राच्या शेवटी आपणास जाणवते. म्हणून 'स्वराज्यशास्त्रा'तील राजनीतीला दिलेला पर्याय लोकनीती ही विधायक आणि तर्कसंगत आहे.

अशाप्रकारे 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यांच्या अभ्यासाअंती खऱ्या अर्थाने आधुनिक राजकीय पध्दतीला एक पर्यायी व्यवस्था देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. पांढरीपांडे, सु. श्री. – विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' : अवलोकन आणि आकलन,

नवभारत, सप्टेंबर २००२, पृ. क्र. ५६

२. उक्त, पृ. क्र. ५६